# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २८ जून, २०१९
## ( सकाळी ९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सालेकसा ग्रामपंचायत (जि.गोंदिया) विसर्जित करुन तिथे नगरपंचायत स्थापित करण्यात येणे, आमगाव खुर्द ग्रामपंचायतीचा समावेश सालेकसा नगरपंचायतीमध्ये करण्यात येणे, सन २०११ च्या जनगणनेनुसार सालेकसा नगरपंचायतीची लोकसंख्या ३६९० असणे, आमगांव खुर्द ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५१९७ असून सद्य:स्थितीमध्ये सालेकसा नगरपंचायतीची एकूण लोकसंख्या ८८८७ असणे, स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत लोकसंख्येच्या प्रमाणात वित्त आयोगाचा निधी तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती करण्यात येणे, सालेकसा नगरपंचायतीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या आमगांव खुर्द ग्रामपंचायतीमधील लोकसंख्येचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याने नव्याने निवडणुका घेणे अपरिहार्य असणे, सालेकसा नगरपंचायतीची माहे ऑक्टोबर, २०१७ मधील निवडणूक न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून झालेली असल्याने जुनी कार्यकारीणी बरखास्त करुन नव्याने निवडणुका घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत शासनास वारंवार विनंती करुनही यासंदर्भात निर्णय घेण्यास शासनास आलेले अपयश, पीआयएल क्रमांक ७२/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत देखील कोणतीही कार्यवाही न करणे, याअनुषंगाने सालेकसा नगरपंचायतीस लोकसंख्येच्या प्रमाणात वित्त आयोगाचा निधी तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांच्या आदेशास अनुसरुन सालेकसा नगरपंचायतीच्या निवडणुका तात्काळ घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **प्रा.संगीता ठोंबरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नगरविकास विभागाच्या दिनांक ८.३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत परळी वैजनाथ शहराच्या मलनिस्सारण प्रकल्प (टप्पा १) च्या प्रकल्पास सुमारे १०१.८६ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, सदर प्रकल्पाची न.प. परळी वैजनाथमार्फत दिनांक २७.५.२०१९ रोजी निविदा निघणे, विहित मुदतीत केवळ तीन कंत्राटदारांनी निविदा भरली असून त्यातील कंत्राटदार हे विहित अटींची पुर्तता करत नसून त्यांच्याकडे आवश्यक कामांचा अनुभव नसतानाही त्यांना पात्र ठरविण्यासाठी नगर परिषद, परळी यांचे प्रयत्न सुरु असणे, उक्त शासन निर्णयानुसार प्रकल्पाचे काम सुरु करण्याआधी काही बंधनकारक कामे पूर्ण करुन घेणे, तसेच या महाभियानांतर्गत मंजुर पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम दिनांक ३१.३.२०१९ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक असताना सन २०१४ पासून पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम अपूर्ण असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असणे, शहरातील कच-याच्या निर्मितीच्या जागी किमान ८० टक्के वर्गीकरण करणे व वर्गीकृत ओल्या कच-यावर १० टक्के प्रक्रिया करणे आणि सुका कचरा पूर्ण प्रक्रिया करणे आवश्यक असताना नगर परिषदेमार्फत शहरातील ओला व सुका कचरा उचलला जात नसून त्यावर कोणतीही प्रक्रिया केली जात नसणे, पर्यायाने नागरिकांना घाण व दुर्गंधीला सामोरे जावे लागणे, या सर्व बाबींची विशेष पथकामार्फत सखोल चौकशी करुन नगरपरिषद, परळी वैजनाथ यांनी केलेली निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, संदीप नाईक, अस्लम शेख, पांडुरंग बरोरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री नरहरी झिरवाळ, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, दिपक चव्हाण विजय वडेट्टीवार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री. अमीन पटेल, मो. आरिफ नसीम खान, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. कालीदास कोळंबकर, पृथ्वीराज चव्हाण, अमित देशमुख, डॉ. संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावित, श्री.डी.पी.सावंत, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. कुणाल पाटील, जयकुमार गोरे, अमित झनक, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, शेख आसिफ शेख रशीद, विश्वजित कदम, संग्राम थोपटे, त्र्यंबकराव भिसे, भारत भालके, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई व ठाणे जिल्हयात अंमली पदार्थाची विक्री कुरिअर व पोस्टामार्फत होत असल्याचे माहे जून, २०१९ च्या दरम्यान उघडकीस येणे, मुंबई विक्रोळी पोस्ट ऑफिसमध्ये ५ किलो इफिड्रीन व दिवा येथील पोस्ट ऑफिसमध्ये ४०० ग्रॅम कोकीन आढळून येणे, मुंबई, ठाणे यासह संपूर्ण राज्यात कोकीन, गांजा, एम.टी.ड्रग्ज, अफू, इफिड्रीन इ. अमली पदार्थाची सर्रास विक्री होत असून या विरोधात राज्यातील अंमली पदार्थ विरोधी

पथकाकडून कोणतीच कारवाई होत नसणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरिय सखोल चौकशी करुन संबंधितावर कारवाई करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, त्यामुळे राज्यात खुलेआम अंमली पदार्थ विक्रीचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांत पसरलेली नाराजी व याबाबत चौकशी करुन अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्यांविरुध्द तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. अमित देशमुख, बाळासाहेब थोरात, अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, प्रा. वर्षा गायकवाड,सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, डॉ. संतोष टारफे, श्री. कुणाल पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, कु. प्रणिती शिंदे, श्री सुनिल केदार, प्रा.विरेंद्र जगताप, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अबु आजमी वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील तुरुंगांमध्ये सन २०१२ ते २०१७ या कालावधीत ४६ कैदी-बंदीवानांचा अनैसर्गिक मृत्यू झाल्याची उघडकीस आलेली घटना , त्यामुळे या अनैसर्गिक मृत्यूंविषयीची कारणे तसेच मृत कैदी-बंदीवानांचे शवविच्छेदन अहवाल, नोंदवण्यात आलेल्या एफआयआर विषयीची प्रगती इत्यादी तपशील सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला देणे, या मृत्यूंविषयी कायदेशीर चौकशी होऊन संबंधित कैदी-बंदीवानांच्या निकटवर्तीयांचा शोध घेऊन त्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षापूर्वी दिलेले असणे तथापि याबाबत शासनाचे त्याकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे बंदिवानांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेली भिती, त्यामुळे याबाबत राज्यातील तुरुंगामध्ये कैदी-बंदिवानाचे मृत्यू होऊ नयेत यासाठी शासनाने करावयाच्या उपाययोजना व प्रतिक्रीया."

(५) **सर्वश्री संजय रायमुलकर, हर्षवर्धन सपकाळ वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"लोणार (जि.बुलढाणा) येथे अशनीपातामुळे निर्माण झालेले जगप्रसिध्द खाऱ्या पाण्याचे सरोवर असून अशा प्रकारचे हे जगातील तिसरे सरोवर असणे, वैज्ञानिकदृष्टया अतिशय महत्वाचे असणाऱ्या लोणार सरोवरातील क्षारयुक्त खारे पाणी झपाटयाने घटत असल्याचे माहे मे, २०१९ च्या सुमारास निदर्शनास येणे, सरोवरातील पाण्याने गत १८ वर्षातील सर्वात कमी पातळी गाठली असल्याचे पुण्यातील सेंटर फॉर सिटिझन सायन्स (सीसीएस) या संस्थेने केलेल्या पाहणीतून उघडकीस येणे, सरोवराला येऊन मिळणारे पाचपैकी दोन प्रमुख नैसर्गिक झरे बंद पडल्यामुळे लोणारच्या अभयारण्यातील वन्यजीवन धोक्यात येणे, झ-यांचा स्त्रोत असणाऱ्या भूजलाचा बेकायदा उपसा सुरु असल्याने ही स्थिती उद्‌भवल्याचे समोर येणे, तसेच सतत तीन वर्षापासून दुष्काळाची परिस्थिती निर्माण

झाल्यामुळे जमिनीवरील पाणी आटत असल्याने त्याचाही परिणाम दिसून येणे, या बाबींचा सरोवराच्या अस्तित्वावर परिणाम होण्याची निर्माण झालेली शक्यता, लोणार सरोवर पाहण्यासाठी तसेच संशोधन व अभ्यासासाठी देश-विदेशातून पर्यटक येत असणे, मात्र औरंगाबाद जिल्हयातील अजिंठा, वेरुळ, दौलताबाद येथे उपलब्ध करुन दिलेल्या सोईसुविधांच्या प्रमाणात पर्यटक व संशोधकांना कोणत्याही सुविधा उपलब्ध नसणे, विशेषत: विदेशी पर्यटकांसाठी या ठिकाणी टूर्स व ट्रॅव्हल कंपन्या, हॉटेल्स, रेल्वे, विमान यांचे तिकिट बुक करण्याची व्यवस्था उपलब्ध नसणे, विदेशी पर्यटकांची त्यामुळे होणारी गैरसोय, परिणामी सदर पर्यटकांचा स्थानिक लोकांना रोजगार निर्मितीसाठी कोणताही विशेष फायदा नसणे, लोणार येथे पोहचण्यासाठी औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, खामगांव, जालना इ.शहरांकडून येणा-या रस्त्यांची दूरवस्था, आसपासचे सांडपाणी सरोवरात सातत्याने सोडले जात असणे, सरोवराच्या काठावरुन सरोवरात खाली जाणारी पायवाट अरूंद व दगडधोंडे यांनी भरलेली असून सदर पायवाटेवर काटेरी झाडे-झुडपे असल्याने अनेक पर्यटक जखमी होत असणे, शासकीय निधीअभावी सदर सरोवराची दुरुस्ती व देखभाल होत नसणे, रायगड किल्ल्याच्या धर्तीवर या सरोवरास प्रत्यक्ष पाहण्यासाठी रोप-वेची उभारणी करण्याबाबत जनतेतून होत असलेली मागणी, लोणार परिसरात आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, बुलढाणा व पर्यटन विभागाकडे दि.११ जुलै, २०१६ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवर मागणी केलेली असतांनाही सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास संबंधित विभागाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी पर्यटकांबरोबरच जिल्हयातील नागरीकांमध्ये व संशोधकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर सरोवराच्या झऱ्यांचा स्त्रोत असलेल्या भूजलाचा बेकायदा उपसा थांबविणे तसेच परिसरामध्ये मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या सरोवराचा संपूर्ण परिसर प्रदुषण मुक्त करण्यासाठी आराखडा तयार करण्या सोबतच बुलडाणा जिल्ह्यातील राजमाता जिजाऊ जन्मस्थळ असलेल्या सिंदखेड राजा या ठिकाणी आणि मौजे देऊळघाट येथील परकोट व घाट दरवाजा, मौजे रोहीणखेड येथील पुरातन मस्जीद या दुर्लक्षीत ऐतिहासिक इमारतीचा व परीसराच्या विकास आराखडा तयार करुन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, ती कार्यवाही करण्यासंदर्भात प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरील प्रकरणी शासनाने त्वरीत करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

(६) **सर्वश्री बच्चू कडू, विनायकराव जाधव-पाटील, शिरीष चौधरी, मोहन फड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील अनाथ बालकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत मा.मंत्री, महीला बालकल्याण यांनी १५ दिवसात मुख्यमंत्री महोदय यांच्यासोबत संयुक्त बैठक घेण्याबाबत दिलेल्या आश्वासनाची अद्यापी पूर्तता न होणे, प्रधान सचिव यांच्या समवेत झालेल्या बैठकीतील

एकूण ५ महत्वपूर्ण निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत कोणताही विहित कालमर्यादा न देणे, अद्यापी केवळ एका निर्णयाची अंमलबजावणी होणे; १८ ते २१ वयोगटातील मुलांना स्थैर्य मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात न येणे, अनुरक्षण गृहाची उपलब्धता नसलेल्या ठिकाणी तेथील अनाथ बालकांना अन्य वसतिगृहात राखीव जागा ठेवण्याबाबत कार्यवाही न होणे, बालगृहातील १५ वर्षावरील मुलांना कालानुरूप व्यवसायिक शिक्षण मिळण्याकरिता कौशल्य विकास विभागाने तर अनाथ बालकांना सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर शिष्यवृत्तीबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, १% समांतर आरक्षण देण्याबाबतच्या शासकीय निर्णयात अट क्रमांक-१ मध्ये जातीचा उल्लेख नसणे, आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा,चुलत भावंडे व इतर नातेवाईक याबाबत काहीही माहिती उपलब्ध न झाल्यासच हे समांतर आरक्षण लागू रहाण्याच्या अटीमुळे बालन्याय मुलांची काळजी संरक्षण अधिनियम, २०१५ च्या ४२ (एक) (दोन) चा तसेच भारतीय राज्यघटनेच्या भाग तीन मूलभूत हक्क सर्वसाधारण समानतेचा हक्क १४, १५(१)(२)(३) चा कायद्यापुढे समानता, धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यावरून भेदभाव करण्यास मनाई करण्याचा घटनात्मक तरतुदीचा भंग झाल्याने या परिपत्रकात तातडीने शुद्धीपत्रक काढून अपंग आरक्षणाच्या धर्तीवर तसेच राखीव निधीबाबत आणि म्हाडा भूखंड आरक्षण व रोजगारासाठी गाळे आरक्षण तरतूद करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची गरज निमार्ण होणे, ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अपंग नोंदणीप्रमाणे अनाथांच्या जन्म मृत्यूची नोंद करण्याची गरज निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यातील अनाथ बालकांमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, आणि प्रतिक्रिया."

(७) **श्री. सुरेश भोळे, वि.स.स, तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात औद्योगिक क्षेत्रात विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे इ. भागांत ८० टक्के इंसेन्टीव्ह दिला असल्याचे निदर्शनास येणे, मात्र जळगाव जिल्हा या सुविधांपासून वंचित असल्याची बाब गांभीर्याने निदर्शनास येणे, एमआयडीसी क्षेत्रातील भूखंड (फॅक्ट्री) हस्तांतरीत करताना डीड ऑफ अॅग्रीमेंटच्या वेळी जागेची आजची किंमत धरणे अयोग्य असून त्यामुळे जवळपास ३ ते ४ पट किंमतीवर स्टॅम्पड्युटी आकारण्यात येते ही बाबही लघु उद्योगांना चालना देण्यास बाधाक असणे, रजिस्ट्रार ऑफ स्टॅम्पस्च्या कार्यालयात स्टॅम्पड्युटी व्हॅल्युएशनसाठी सादर केल्यानंतर ४५ दिवसांत त्यावर कार्यवाही होणे अपेक्षित असताना ४ ते ५ महिने त्यावर कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी जळगाव जिल्ह्यातील कारखानदारांना प्रचंड आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागणे, कारखाना सुरू होण्यास विलंब झाल्याने गुंतवणूकीवरील व्याज व इतर सर्व खर्चही मोठ्या प्रमाणात वाढत असल्याची बाब निदर्शनास येणे, एस.जी.एस.टी. ग्रासमध्ये परत मिळणार की नेटमध्ये यामध्ये विहित नमूणा प्रपत्रात कोणतीही स्पष्टता नसल्याने

उद्योजकांमध्ये पसरलेला संभ्रम, जळगाव जिल्ह्यातून इतर राज्यांत व परदेशात मोठ्या प्रमाणावर मालाची निर्यात होत असल्याने सी.जी.एस.टी तसेच आय.जी.एस.टी.अंतर्गत प्रोत्साहने मिळण्यासाठी कोणतीही तरतूद नसल्याची बाब निदर्शनास येणे, पीएसआय २०१३ ला नवीन पॉलिसी येईपर्यंत अथवा मार्च २०१९ पर्यंत शासनाने मुदतवाढ देण्यात आल्यानंतरही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी महाराष्ट्रातील उद्योग आर्थिक अडचणीत येणे, १ ऑक्टोबर २०११ पासून मुद्रांक शुल्क माफीसाठी पात्र घटकांना मुद्रांक शुल्क भरण्यास भाग पाडण्यात आले व ज्या उद्योगांना मुद्रांक शुल्क सवलत मिळाली होती त्यांना सवलतीची रक्कम व्याजासह भरण्याच्या नोटीसा शासनाकडून प्राप्त झाल्याने सर्व पात्र घटक शासनाच्या सवलतींपासून वंचित असल्याचे निदर्शनास येणे, एमआयडीसी, जळगावमध्ये भूखंड शिल्लक नसल्याने इंजिनिअरिंग किंवा पॉलिटेक्निक सारखी महाविद्यालये जळगावमध्ये उपलब्ध होऊ न शकल्याची बाब निदर्शनास येणे, जळगावमध्ये राज्यातील अन्य भागांप्रमाणे उद्योगांना वीज सवलत मिळत नसल्याने येथील उद्योग स्थलांतरीत होत असल्याची बाब निदर्शनास येणे, येथील उद्योगांना प्रोत्साहने मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, जळगावमधील रस्त्यांची दुरावस्था दूर करून औद्योगिक क्षेत्रात उद्योगांना चालना मिळण्यासाठी मुलभूत सुविधा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, जळगावसाठी स्वतंत्र इंडस्ट्रीअल झोन निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री. सुभाष पाटील, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात ३१ मे, २०१९ पासून शासनाने समुद्रात मच्छिमारी बंद करण्याचे आदेश असतानाही भारताबाहेरील विदेशी मच्छिमारांच्या १० बोटी दाभोळ बंदरात (जि.रत्नागिरी) पकडण्यात येणे, परदेशातील मच्छिमारांना भारताच्या समुद्र हद्दीत मच्छिमारी करण्यासाठी आय.ओ.टी.सी. (इंडियन ओशन ट्युना कमिशन) परवानगी आवश्यक असतानाही दाभोळ येथे पकडण्यात आलेल्या बोटींकडे आय.ओ.टी.सी. ची परवानगी नसणे, दि. ७ जून, २०१९ रोजी वा त्या सुमारास भारतीय हद्दीत वादळ झाल्याने २०० नॉटीकल अंतरावरून चिनच्या बोटी दाभोल बंदरात येणे शक्य नसणे, सदर बोटीमध्ये जवळपास २०० खलाशी असून त्यापैकी १०० खलाशांचे पासपोर्टची मुदत संपलेली असणे, प्रत्येकी एका बोटीकडून एक महिन्याला ३०० ते ४०० टन मच्छिमारी करणे, डिसेंबर २०१८ रोजी मरिन ट्रॅफिक ऍपच्या स्किरन शॉट वरून भारताच्या हद्दीत (EEZ) २०० ते २५० चीनच्या बोटी मासेमारी करत असल्याचे दिसून येणे, भारताच्या हद्दीत येवून या बोटी सुमारे ८ लाख टन मासेमारी करून जाणे, भारताच्या हद्दीत १ जून ते ३१ जुलै या कालावधीत मच्छिमारी करण्यास बंदी असतानाही या बोटी घुसखोरी करून मासेमारी करत असणे, त्यामुळे स्थानिक मच्छिमारांवर अन्याय होणे व त्यांचा परिमाणा मत्स्य साठा उत्पन्नावर होणे, सबब

परदेशातील मच्छिमारांवर कारवाई करण्यासाठी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया.”

(९) **डॉ. राहूल पाटील, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी तालुक्यातील बोबडे टाकळी, पिंगळी कोयळा, जोड परळी, सांगवी खुर्द व साडेगांव येथे सुमारे ४०० शेतक-यांनी सन २०१८-१९ या वर्षातील पंतप्रधान पिक विमा योजनेंतर्गत बोबडे टाकळी येथील संग्राम कक्षामध्ये खरीप व रब्बी पिक विम्याची रक्कम भरणे, रक्कम भरणा-या काही शेतक-यांना पावत्या नंतर देण्यात येतील असे सांगून पावत्या न देणे, तसेच काही शेतक-यांना बनावट पावत्या देणे, पिक विम्याची रक्कम विमा कंपनीकडे भरलेच नसल्याचे आढळून येणे, त्यामुळे शेतकरी पीक विम्याच्या रक्कमेपासून वंचित असणे, या वर्षीच्या खरीप हंगामातील पेरणीसाठी, बी-बियाणे, खते खरेदी करण्यासाठी शेतक-यांकडे पुरेसे पैसे नसणे, त्यामुळे शेतकरी हवालदील होणे, सदर शेतक-यांनी सामुदायीक आत्महत्या करण्याची दिलेला इशारा, या गैरव्यवहाराची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१७ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली मागणी, शासनाने पीक विम्यातील गैरव्यवहाराची तात्काळ चौकशी करुन शेतकऱ्यांची फसवणूक करणा-या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची व फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

(१०) **श्री.डी.एस.अहिरे, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अमीन पटेल, अस्लम शेख, कुणाल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

“साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पेसा अंतर्गत समावेश न झालेल्या १०१ गावांचा पेसा कायदा अंतर्गत समावेश करावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे गत तीन वर्षापासून वारंवार करणे, सदर गावे पेसा कायदा अंतर्गत येण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा अशी मागणी असणे, सदर गावे पेसा कायदा अंतर्गत नसल्यामुळे अनेक विकासकामांपासून वंचित राहणे, पेसा अंतर्गत समावेश न झाल्याने येथील तोरणपुडी, चारणपुडी या गावांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकणे, १०१ गावांतील ग्रामस्थांनी या गावांचा पेसा अंतर्गत समावेश करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष, त्यामुळे शासनाने या विकासापासून वंचित गावांचा पेसा कायद्यांतर्गत समावेश करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

(अ) तारांकित प्रश्न

(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : **"एड्स नियंत्रणासाठी काम करणाऱ्या संस्थांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत"** या विषयावरील श्री.सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ४४२४३ ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) महिला व बाल विकास मंत्री** :

(क) "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा सदतिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) रोजगार हमी मंत्री** : "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी

योजना-महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना या योजनांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **आदिवासी विकास मंत्री** : "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे सतरावा, अठरावा व एकोणिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा एकोणसाठावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दहावा व अकरावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**पाच : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**सहा : औचित्याचे मुद्दे.**

**सात : वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६०(२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**आठ : सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)**

(१) महसलू व वन विभाग

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(३) नगरविकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**(गुरुवार, दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**नऊ : श्री सुनिल प्रभु, ॲड. राज पुरोहित, सर्वश्री अजय चौधरी, अतुल भातखळकर, सदा सरवणकर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री सुनिल शिंदे, मंगलप्रभात लोढा, ॲड. गौतम चाबुकस्वार, सर्वश्री अमित साटम, संजय पोतनीस, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री प्रकाश महेता, प्रताप सरनाईक, राम कदम, संजय शिरसाट, कॅप्टन आर तामील सेल्वन, सर्वश्री मनोहर भोईर, सरदार तारासिंह, मंगेश कुडाळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, नरेंद्र मेहता, रमेश लटके, संजय केळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री नरेंद्र पवार, तुकाराम काते, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सुभाष भोईर, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, पास्कल धनारे, सुरेश गोरे, किसन कथोरे, राजाभाऊ वाजे, योगेश घोलप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात राज्य शासनाने पालघर जिल्हयातील पालघर व वसई संपूर्ण तालुके आणि रायगड जिल्हयातील अलिबाग, पेण, पनवेल व खालापूर संपूर्ण तालुके यांचा समावेश करुन प्राधिकरण क्षेत्राचा केलेला विस्तार, सदर निर्णयामुळे वसई-मिरा-भाईंदर दरम्यान नवीन खाडीपूल, विकास केंद्रे, वसई-विरार क्षेत्रासाठी सुर्या पाणी पुरवठा प्रकल्प, नैना प्रकल्पास चालना, ट्रॉन्स हार्बर रेल्वे अलिबाग पर्यंत इत्यादि विविध योजना कार्यान्वित होणार असणे, मुंबईतील महत्वाकांक्षी सागरी किनारा रस्त्याचा (कोस्टल रोड) प्रकल्प, मुंबईतील मिठी नदी स्वच्छ करण्याच्या योजनेंतर्गत शहरातील सांडपाणी प्रक्रिया करुन ते पाणी मिठी नदीत पुन्हा सोडण्याची योजना, केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी परियोजनेंतर्गत राज्यातील पुणे, ठाणे, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, कल्याण-डोंबिवली या ८ शहरासाठी राज्य शासनाला माहे फेब्रुवारी, २०१९ अखेर १५६८ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येणे, गृहनिर्माण धोरणास मान्यता देण्यास होत असलेला विलंब, मुंबईतील शिवडी, गोराई (बोरिवली), माहिम भागातील जैवविविधतेमुळे पानथळीने व्यापलेले क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून जाहिर करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या

सूचना, तथापि, जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे पानथळ क्षेत्रांवर दिवसेंदिवस वाढत जाणारी अनधिकृत बांधकामे, मुंबई शहर व उपनगरातील विकासक, मोठमोठया कंपन्या, मॉल्स यांनी महापालिकेचा सुमारे १३३.२५ कोटी रुपयांचा थकवलेला कर, मुंबईतील अपूर्ण असलेले एसआरए प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उपाययोजना, म्हाडाच्या ५६ वसाहतींचा रखडलेला पुनर्विकास, मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त व बिगर उपकरप्राप्त सुमारे १४०० इमारती, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या इमारत व पुनर्रचना मंडळाच्या व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतंर्गत बांधलेल्या इमारतीची दुरुस्ती, बीपीटी व बीआयटीच्या जागेवरील धोकादायक इमारती, म्हाडाच्या इमारतींमध्ये ३०० पेक्षा जादा घुसखोर असल्याचे निष्पन्न होणे, राज्यात ६० लक्ष झाडे लावण्याचा शासनाची महत्वाकांक्षी योजना, वांद्रे-पूर्व येथील शासकीय अधिकारी-कर्मचारी यांना दिलेल्या निवासस्थानांच्या जागेवर मालकी हक्काने निवासस्थाने बांधून देण्याची मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

दहा : **सर्वश्री अजित पवार, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, मो. आरीफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, बसवराज पाटील, हसन मुश्रीफ, सुनील केदार, भास्कर जाधव, प्रा. वीरेंद्र जगताप, सर्वश्री संदीप नाईक, जयकुमार गोरे, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री गोपालदास अग्रवाल, सुरेश लाड, अमित देशमुख, ॲड दिलीप सोपल, सर्वश्री डी.एस.अहिरे, राणाजगजीतसिंह पाटील, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, विश्वजीत कदम, राजेश टोपे, मधुकरराव चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, डि पी. सावंत, राहुल मोटे, वसंतराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, अमीन पटेल, दत्तात्रय भरणे, ॲड के.सी.पाडवी, सर्वश्री बाळासाहेब पाटील, सिध्दाराम म्हेत्रे, संजय कदम, कुणाल पाटील, दिपक चव्हाण, काशिराम पावरा, श्रीमती दीपिका चव्हाण, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, पंकज भुजबळ, राहुल बोंद्रे, प्रदीप जाधव-नाईक, अमर काळे, विजय भांबळे, सुभाष उर्फ पंडीतशेठ पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, अमित झनक, नरहरी झिरवाळ, रणजित कांबळे, अवधुत तटकरे, श्रीमती अमिता चव्हाण, श्री राहुल जगताप, डॉ.संतोष टारफे, श्री शेख आसिफ शेख रशीद, डॉ. मधुसूदन केंद्रे, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, सर्वश्रीमती सुमन पाटील, संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबकराव भिसे, भारत भालके, कालिदास कोळंबकर, नितेश राणे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"गेल्या पावणेपाच वर्षात विविध विभागामध्ये उघडकीस आलेल्या घोटाळयांची व गैरव्यवहारांची शासनाकडून गांभिर्याने दखल घेतली न जाणे, शासनाच्या विद्यमान मंत्री व

राज्यमंत्र्यांनी गैरव्यवहार केल्याची प्रकरणे उघडकीस येणे, तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी झोपडपट्टी पुर्नविकास योजनेत सुमारे ५०० कोटी रुपयांचा केलेला गैरव्यवहार, तत्कालीन सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्र्यांविरुध्द दारु दुकानाचा परवाना मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून १ कोटी ९२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशाने त्यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात येणे, उर्जा राज्यमंत्री यांनी यवतमाळ शहरातील सुमारे ११ कोटी रुपये किंमतीचा भूखंड बनावट कागदपत्रे तयार करुन त्यावर बँकामधून कोटयवधी रुपये कर्ज घेऊन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे मा.न्यायालयाने दिलेले आदेश, शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून भ्रमणध्वनी (मोबाईल) खरेदीमध्ये १०६ कोटी रुपयाचा झालेला भ्रष्टाचार उघडकीस येणे, जलसंपदा मंत्र्यांनी मानापूर येथील महार वतनाची जमिन जबरदस्तीने घेतल्याचा होत असलेला आरोप, महिला व बालविकास विभागात पुरक पोषण आहार योजनेचे कंत्राट देताना त्यात ७५० कोटी रुपयाचा करण्यात आलेला गैरव्यवहार, मुंबईतील गोरेगाव येथील आरे वसाहतीत आदिवासींना सोयीसुविधा देण्याच्या नावाखाली व्यायामशाळेचे बांधकाम केल्याचे उघडकीस येणे, एका मंत्र्याच्या मेव्हणे व अन्य नातेवाईक संचालक असलेल्या व्हिकोटोरिया फुड प्रोसेसिंग कंपनीवर थकीत कर्ज प्रकरणी झालेले गंभीर आरोप, जेएसडब्ल्यु इस्पात लिमिटेड या कंपनीला ५९२ कोटी रुपयाचे वीज शुल्क माफी देण्याच्या प्रकरणात करण्यात आलेला गैरव्यवहार, जलयुक्त शिवार योजनेतील वेगवेगळया कामांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असताना मा.मंत्री (जलसंधारण) यांनी विधानपरिषद सभागृहात भ्रष्टाचार झाल्याचे मान्य केलेले असणे, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खुल्या चौकशीची मागणी केल्यानंतरही ती दबावामुळे फेटाळली जाणे, शिक्षण विभागातील अग्निशमन यंत्र घोटाळयातील चौकशी अहवाल गायब झाल्याची बाब उघडकीस येणे, याच विभागातील राष्ट्रपुरुषांच्या तस्वीरी व अर्ली रिडल बुक खरेदी प्रकरणात केंद्र शासनाने दोषी ठरवून देखील त्यांच्या विरुध्द शासनाने कोणतीही कारवाई न करणे, सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधी खरेदीत करण्यात आलेला घोटाळा, आदिवासी विभागाने साहित्य खरेदीत केलेला गैरव्यवहार, पणन विभागातील तूरडाळ भरडाईत झालेला घोटाळा, पर्यटन महामंडळाने तोरणमाळ येथील जमिन हडप करण्याचे प्रकरण इत्यादी प्रकरणात चौकशी करण्याची घोषणा होऊन देखील अहवाल सादर करण्यात दिरंगाई झालेली असणे, सोलापूर येथील सार्वजनिक भूखंडावर आरक्षण असतांना बेकायदेशीर बंगला बांधल्याप्रकरणी चौकशी होऊन चौकशीत गंभीर दोष आढळून आल्यानंतरही दोषीविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न येणे, सारंगखेडा चेतक महोत्सवाचे बेकायदेशीर कंत्राट दिल्याची बाब उघडकीस येणे, राज्याच्या पोलीस दलात भ्रष्टाचार मोठया प्रमाणावर वाढला असून मुंबईत एका दिवसात ३ वरिष्ठ पोलीस अधिकारी लाच घेताना पकडले जाणे, ठाणे परिक्षेत्रात सन २०१९ मध्ये पाच महिन्याच्या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २४ कारवाया केलेल्या असणे, विदर्भातील समन्वयीन कृषी विकास प्रकल्पामध्ये सन २०१८-१९ मध्ये अवघ्या सात महिन्यात १०३ कोटी ५० लक्ष रुपयाच्या अनुदानामध्ये अपहार झालेला असणे, या रक्कमेचा अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पणन मंत्र्यांनी पाठीशी घातलेले असणे, वरिष्ठ पातळीवरील

भ्रष्टाचार प्रकरणांना शासन पाठीशी घालत असल्याचा संदेश जात असल्यामुळे शासकीय यंत्रणामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु असणे, राज्यकर्तेच गैरव्यवहार करीत असल्यामुळे शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यात सुध्दा आर्थिक गैरव्यवहार करण्यास मिळत असलेले बळ, आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार करणाऱ्याविरुध्द कारवाई करण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे जनमानसात शासनाविरुध्द निर्माण झालेला असंतोष तसेच नुकतेच राज्यात लोकसभेच्या निवडणुका पार पडलेल्या असणे, राज्यातील अनेक ठिकाणी मतदार यादयांमध्ये घोळ झाल्याचे आढळून येणे, मतदारनोंदणी करताना भरण्यात आलेले फॉर्म चुकीच्या पध्दतीने भरल्यामुळे किंवा काही नावे चुकीची लिहिली गेल्यामुळे मतदार यादीत मतदारांची नावे न येणे, १० वर्षापूर्वी मतदार यादीत नाव नोंदणी केलेल्या मतदारांकडे पुरावा नसल्यामुळे किंवा वयामुळे फोटोत फरक होत नसल्यामुळे मतदारांना मतदानाचा हक्क बजावता न येणे, काही ठिकाणी मतदारांकडे निवडणुक ओळखपत्र असताना सुध्दा त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट नसणे, राज्यातील झोपडपट्टीत राहणाऱ्या अल्पसंख्यांक व मागासवर्गीय समाजातील मतदारांना मतदान करण्यासाठीच्या पावत्या नसल्यामुळे समुदाय मतदानापासून वंचित राहिलेला असणे, त्यामुळे मतदानाची टक्केवारी कमी होणे, निवडणुकीचे काम करण्यास शिक्षकांनी नकार दिल्यामुळे मतदार यादया तयार करण्यास निर्माण झालेल्या अडचणी, आधारकार्ड योग्य पुरावा असल्याचे गृहीत धरुन मतदार यादया बनविण्याचे काम केल्यास मनुष्यबळ व वेळ वाचणार असल्यामुळे या कामासाठी आधारकार्ड पुरावा म्हणून वापरण्याची आवश्यकता, निवडणुकीमध्ये ईव्हीएमव्दारा मतदान पध्दतीबाबत राजकीय पक्ष व जनतेमध्ये संशयाचे वातावरण असून ईव्हीएम मशीनव्दारे झालेले मतदान व मतमोजणी यामध्ये तफावत असल्याचे उघड झाले असणे तसेच भविष्यात बॅलेट पेपर पध्दतीने मतदान घेण्यात यावे, अशी अनेक लोकप्रतिनिधी व जनतेची एकत्रित मागणी असणे, बॅलेट पेपरचा उपयोग कर्नाटक व इतर राज्यात करण्यात येणे, त्याला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळणे, हीच पध्दत राज्यात सुरु करण्याबाबत व निवडणुक प्रक्रिया सुटसुटीत करुन मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी शासनाने याप्रकरणी केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

**अकरा : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती

दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्तावः-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणो) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, बसवराज पाटील, संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राहूल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. भारत भालके, शेख आसिफ शेख रशीद, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री. अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ

पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, संग्राम थोपटे, सुनिल केदार, अमर काळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. अमित झनक, डी.एस.अहिरे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री.अमित झनक, राहूल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — पंढरपूर मंदिर (सुधारणा)

विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, संग्राम थोपटे, सुनिल केदार, अमर काळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. अमित झनक, डी.एस.अहिरे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री.अमित झनक, राहूल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र

सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, बसवराज पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, त्र्यंबकराव भिसे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, बसवराज**

**पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, त्र्यंबकराव भिसे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — महाराष्ट्र करविषयक कायदे (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१९**

---

**(ब) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०१९

---

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री वसंतराव चव्हाण, कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशीद, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९

विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ड) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.**

---

**(इ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, कुणाल पाटील, अस्लम शेख, बसवराज पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ — महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, शेख आसिफ शेख रशीद, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सकपाळ, अमिन झनक, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ज) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

---

## अशासकीय कामकाज

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**बारा : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८२ - महाराष्ट्र देवता, संत, राष्ट्रपुरुष, धर्मग्रंथ यांचे विडंबनावर नियंत्रण विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे**

(३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक १९- महाराष्ट्र अनुसूचित जाती उप-योजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, नियतवाटप आणि वापर) विधेयक, २०१८- **ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स. यांचे**

(४) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २०- महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(५) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २१- महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(६) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २२- जमिन महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(७) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २३- नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.अमित साटम, वि.स.स. यांचे**

(८) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २४- महाराष्ट्र जनजाती उप-योजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, नियतवाटप आणि वापर) विधेयक, २०१८- **ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स. यांचे**

(९) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २५ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन विधेयक, २०१८ - **श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे**

(१०) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५२ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे**

(११) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५३ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०१८ - **श्री.अमीत साटम, वि.स.स. यांचे**

(१२) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५४ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०१८ - **श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचे**

(१३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८१ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१८ - **श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स. यांचे**

(१४) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८२ - महाराष्ट्र वेश्म मालकी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.राहुल कुल, वि.स.स. यांचे**

(१५) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८३ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०१८ - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे**

(१६) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८४ - महाराष्ट्र राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०१८ - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे**

(१७) सन २०१९ चे वि.स.वि.क्रमांक २६ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१९ - **श्री.योगेश घोलप, वि.स.स यांचे**

(१८) सन २०१९ चे वि.स.वि.क्रमांक २७ – महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात फलक लावण्यास, समाज माध्यमावर व संकेतस्थळावर प्रसिध्द होण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१९ - **श्री.सुनिल केदार, वि.स.स यांचे**

(१९) सन २०१९ चे वि.स.वि.क्रमांक २३ – महाराष्ट्र राज्यातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लीम समाजातील नागरिकांना नोकरी व शैक्षणिक क्षेत्रात आरक्षण देण्याकरिता विधेयक, २०१९ - **श्री.शेख आसिफ शेख रशीद, वि.स.स यांचे**

(२०) सन २०१९ चे वि.स.वि.क्रमांक ३८ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ – **सर्वश्री. महेश लांडगे, सुरेश गोरे, वि.स.स यांचे**

**(ब) विचारार्थ :**

**(दिनांक १३ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतू, पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय विधेयके)**

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री.मनोहर भाईर, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र

देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भाईर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७० - सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २७ जून, २०१९

**जितेंद्र भोळे**
सचिव (का.)
महाराष्ट्र विधानसभा